9 JUN 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





# 'आव्हान' पेलताना!

शिवाजी विद्यापीठात राज्यपाल कार्यालयाच्या वतीने सुरू असलेल्या 'आव्हान' या आपत्ती व्यवस्थापन राज्यस्तरीय शिबिराची सांगता शनिवारी (ता. १०) होत आहे. राज्यभरातील १४ विद्यापीठांचे १२५० विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले आहेत. दहा दिवसांत एनडीआरएने दिलेल्या प्रशिक्षणातून कोणतेही आव्हान पेलण्यासाठी सज्ज असल्याचा विश्वास विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

-प्रतिनिधी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JUN 2017
लोकमत

# सी. विद्यासागर राव उद्या दौऱ्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव हे उद्या, शनिवारी जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. सकाळी ९.५० वाजता मुंबई येथून विमानाने त्यांचे कोल्हापूर विमानतळ येथे आगमन होणार आहे. ९.५५ वाजता मोटारीने अंबाबाई मंदिराकडे प्रयाण होणार असून अंबाबाईचे दर्शन घेणार आहेत. येथून १०.५० वाजता मोटारीने शिवाजी विद्यापीठाकडे प्रयाण होणार आहे. येथे सकाळी ११.१५ वाजता शिवाजी विद्यापीठ येथे आयोजित 'आव्हान-२०१७' समारोप कार्यक्रमास ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर दुपारी १.३० वाजता शिवाजी विद्यापीठ येथून मोटारीने कोल्हापूर विमानतळाकडे प्रयाण होणार असून १.५० वाजता विमानाने मुंबईकडे प्रयाण होणार.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 JUN 2017
सकाळ

# राज्यपालांचा उद्या विद्यापीठात कार्यक्रम

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सी. विद्यासागर राव येत्या शनिवारी (ता. १० जून) शिवाजी विद्यापीठात येत आहेत. विद्यापीठात सुरू असलेल्या आव्हान-२०१७ या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप लोककला केंद्रात सकाळी साडेदहा वाजता त्यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या वेळी विद्यापीठाच्या परिसरात साकारण्यात येत असलेल्या चॅन्सलर्स कोकोनट गार्डनचे उद्घाटन आणि रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन श्री. राव यांच्या हस्ते होणार आहे. पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महापौर हसीना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांची प्रमुख उपस्थिती असेल. विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजनही त्यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.

9 JUN 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यपालांच्या उपस्थितीत उद्या 'आव्हान'चा समारोप

## कोकोनट गार्डनचे उद्घाटन, रसायनशास्त्रच्या विस्तारित इमारतीचेही भूमिपूजन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महाराष्ट्राचे राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सी. विद्यासागर राव शनिवारी (दि. १०) शिवाजी विद्यापीठात येत आहेत. त्यांच्या उपस्थितीत 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप होणार आहे. तसेच चॅन्सलर्स कोकोनट गार्डनचे उद्घाटन आणि रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजनही त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महापौर हसीना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शनिवारी सकाळी १०.३० वाजता हा समारंभ होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली आहे.



शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ जूनपासून 'आव्हान-२०१७' हे राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) यांच्या सहकार्याने सुरू आहे. या दहा दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप १० जून रोजी कुलपती राव यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. 'आव्हान' हा उपक्रम कुलपती कार्यालयाचा असून तो २००७ पासून दरवर्षी राबविण्यात येतो. पहिल्या 'आव्हान' शिबिराचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाने भूषविले होते. त्यानंतर यंदा शिबिराचे यजमानपद भूषविण्याचा मानही विद्यापीठास मिळाला. या शिबिरात सहभागी शिबिरार्थींना 'चॅन्सलर्स ब्रिगेड' असे सन्मानपूर्वक संबोधले जाते. या ब्रिगेडचा सन्मान आणि अभिनंदन सोहळा कुलपती यांच्या उपस्थितीत साजरा होण्याला विशेष महत्त्व आहे.

विद्यापीठाने संगीत अधिविभागाच्या पाठीमागील विहिरीच्या परिसरात नारळ उद्यान विकसित करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. तिचे 'चॅन्सलर्स कोकोनट गार्डन' असे नामकरण करण्यात आले आहे. कुलपती राव यांच्या हस्ते या उद्यानाचे डिजिटल उद्घाटन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या सुवर्णमहोत्सवी रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजनही त्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

- 9 JUN 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील ‘आव्हान’ प्रशिक्षण शिबिराचा उद्या समारोप

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात सुरु असलेल्या ‘आव्हान’ या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप शनिवारी (दि. १०) सकाळी सव्वाअकरा वाजता राज्यपाल तथा शिवाजी विद्यापीठाचे कुलपती सी. विद्यासागर राव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी विद्यापीठात साकारण्यात येत असलेल्या चॅन्सलर्स कोकोनट गार्डनचे उद्घाटन आणि रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन केले जाणार आहे.

या कार्यक्रमास पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, महापौर हसिना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार प्रमुख उपस्थित असणार आहेत. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात हा कार्यक्रम होणार आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी गुरुवारी दिली. ‘आव्हान’ शिबिरांतर्गत आज, शुक्रवारी दुपारी चार वाजता शोभायात्रा काढण्यात येणार आहे. यात राज्यातील १४ विद्यापीठांतील स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

## उत्कृष्ट विद्यापीठाला मिळणार चषक

या दहादिवसीय 'आव्हान' शिबिरातून उत्कृष्ट विद्यापीठ, जिल्हा, दोन कार्यक्रमाधिकारी, शोभायात्रेतील संघ आणि उत्कृष्ट स्वयंसेवक (विद्यार्थी, विद्यार्थिनी प्रत्येकी दोन) यांना चषक देऊन गौरविण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाचे 'एन.एस.एस.'चे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांनी दिली.

9 JUN 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'आव्हान २०१७' चा उद्या समारोप

- राज्यपाल सी. विद्यासागर राव यांची उपस्थिती
- चॅन्सलर्स कोकोनट गार्डनचे होणार उद्‌घाटन
- रसायनशास्त्र अधिविभाग इमारतीचेही भूमिपूजन

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या 'आव्हान-२०१७' या राज्यस्तरीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप शनिवारी (दि. १० जून) महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव यांच्या उपस्थितीत होणार आहे. यावेळी विद्यापीठ परिसरात साकारण्यात येत असलेल्या चॅन्सलर्स कोकोनट गार्डनचे उद्‌घाटन आणि रसायनशास्त्र अधिविभागाच्या विस्तारित इमारतीचे भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, महापौर हसिना फरास, जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विद्यापीठाच्या लोककला केंद्रात शनिवारी सकाळी साडेदहा वाजता हा कार्यक्रम होणार असल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १ जूनपासून आव्हान-२०१७ हे राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एन. डी.आर.एफ.) यांच्या सहकार्याने सुरू आहे. या दहा दिवसीय प्रशिक्षण शिबिराचा समारोप १० जून रोजी राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. 'आव्हान' हा उपक्रम राज्यपाल कार्यालयाचा असून तो २००७पासून दरवर्षी राबविण्यात येतो. पहिल्या आव्हान शिबिराचे यजमानपद शिवाजी विद्यापीठाने भूषविले होते. त्याचप्रमाणे यंदाच्या शिबिराचे यजमानपद भूषविण्याचा मानही शिवाजी विद्यापीठास प्राप्त झाला आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

या शिबिरात सहभागी शिबिरार्थींना चॅन्सलर्स ब्रिगेड असे सन्मानपूर्वक संबोधले जाते. या ब्रिगेडचा सन्मान आणि अभिनंदन सोहळा कुलपती यांच्या उपस्थितीत साजरा होत असल्याने याला विशेष महत्त्व आहे. विद्यापीठाने संगीत अधिविभागाच्या पाठीमागील विहिरीच्या परिसरात नारळ उद्यान विकसित करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. तिचे चॅन्सलर्स कोकोनट गार्डन असे नामकरण करण्यात आले आहे. दरम्यान, राज्यपाल राव हे कोल्हापूर दौऱ्यात शनिवारी सकाळी दहा वाजता श्री महालक्ष्मी देवीचे दर्शन घेणार आहेत.